# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:06.07.2024** **वार:शनिवार**

1. केंद्र सरकारकडून राज्याला विशेष दर्जा किंवा विशेष पॅकेज मिळण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची अर्थमंत्री अजित पवार यांची विधानसभेत ग्वाही
2. स्पर्धा परीक्षेत गैरव्यवहार रोखण्यासाठीचं महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा अनुचित मार्ग प्रतिबंध विधेयक विधानसभेत सादर
3. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते शौर्य पुरस्कार प्रदान
4. नीट पीजी आता 11 ऑगस्ट रोजी घेतली जाणार आणि
5. महिला क्रिकेटमध्ये टी - 20 मालिकेतील पहिल्या सामन्यात दक्षिण अफ्रिकेची भारतावर मात

**अजित पवार अर्थसंकल्प**

केंद्र सरकारकडून राज्याला विशेष दर्जा किंवा विशेष पॅकेज मिळावं यासाठी प्रयत्न करणार असल्याचं अर्थमंत्री अजित पवार यांनी काल विधानसभेत सांगितलं. अर्थसंकल्पावरील चर्चेला ते उत्तर देत होते. राजकोषीय तूट केंद्र सरकारनं घालून दिलेल्या 3 टक्क्यांच्या मर्यादेत असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. राज्यातल्या विविध शहरात मेट्रोचे काम पूर्ण झाल्यावर दळणवळण व्यवस्थेत सुधारणा होईल. वाहनं कमी होतील, परकीय गुंतवणूक वाढेल आणि राज्याच्या अर्थव्यवस्थेत मोठी भर पडेल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली. राज्याची अर्थव्यवस्था चिंताजनक परिस्थितीत असल्याची बदनामी करणं टाळा असं आवाहन त्यांनी विरोधकांना केलं.

महिलांसाठीच्या पिंक ई रिक्षा योजनेचा विस्तार, जिल्ह्याच्या क्षमतेनुसार योजनेचे लाभार्थी ठरवण्याचे अधिकार, शेतकऱ्यांना साडे 8 लाख कृषी पंप देणार, त्यासाठी 90 टक्क्यांपर्यंत अनुदान यासह कोल्हापुरातल्या जोतिबा मंदिर आणि परिसराच्या विकासासाठी स्वतंत्र प्राधिकरण, त्र्यंबकेश्वर मधल्या निवृत्तीनाथ महाराजांच्या समाधी स्थळाचा विकास, सातारा जिल्ह्यात शहीद तुकाराम ओंबाळे यांच्या स्मारकासाठी अनुदान अशा विविध घोषणा अर्थमंत्र्यांनी केल्या.

**विधीमंडळ कामकाज**

विधानपरिषदेतही काल अर्थसंकल्पावरची चर्चा सुरू झाली. राज्याच्या तिजोरीत खडखडाट असताना निवडणुका डोळ्यासमोर ठेवून केवळ स्वतःचा अजेंडा राबवण्यासाठी सरकारनं अर्थसंकल्पाचा वापर केला आहे अशी टीका विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केली. जनतेशी संबंधित असलेल्या सर्व विभागांना सर्वात कमी तरतूद या अर्थसंकल्पात आहे. गेल्या अर्थसंकल्पातल्या योजनांचीही अंमलबजावणी झालेली नाही, असं दानवे म्हणाले.

विधानसभेत स्पर्धा परीक्षेत गैरव्यवहार रोखण्यासाठीचं महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा अनुचित मार्ग प्रतिबंध विधेयक काल मांडण्यात आलं. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षा, शिक्षक अभियोग्यता आणि बुद्धिमत्ता चाचणी आणि शिक्षक पात्रता चाचणी यासह शासनाच्या विविध विभाग आणि प्राधिकरणाकडून घेतल्या जाणाऱ्या परीक्षांना या कायद्यातील तरतुदी लागू असतील. यात अयोग्य मार्गांचा वापर करणाऱ्यांना 3 ते 5 वर्ष शिक्षा आणि 10 लाख रुपये दंड करण्याची तरतूद आहे. परीक्षा घेण्याची जबाबदारी असलेल्या संस्था, सेवा पुरवणाऱ्या संस्थेचे कर्मचारी यांनाही

दोषी आढळल्यास शिक्षा सुनावली जाणार आहे. दरम्यान, महागाई सातत्याने वाढत असून त्याकडे सरकार दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करत महाविकास आघाडीनं विधानभवन परिसरात निदर्शनं केली.

**<u>छगन भुजबळ</u>**

राज्यातल्या भटके, विमुक्त समाजातल्या नागरिकांना शिधापत्रिका मिळवण्यासाठी ओळखपत्र आणि वास्तव्याचा पुरावा देण्याची अट शिथील करण्याचा निर्णय सरकारनं घेतला आहे. अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागानं याबाबतचा शासन निर्णय जारी केल्याची माहिती या विभागाचे मंत्री छगन भुजबळ यांनी दिली. या निर्णयानुसार भटक्या विमुक्त समाजाच्या नागरीकांना नवीन शिधापत्रिका मिळण्यासाठी मतदार ओळखपत्र, राजपत्रित अधिकाऱ्याचे भटक्या विमुक्त समाजाच्या नागरीक असल्याबाबतचे प्रमाणपत्र, रहिवासासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिलेले रहिवासी प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येणार आहे.यातील कोणतंही कागदपत्र किंवा आधारकार्ड उपलब्ध नसल्यास अर्जदाराकडून स्वयंघोषणापत्र भरुन घेण्यात येणार आहे.

**<u>शौर्य पुरस्कार</u>**

भारतीय सेना, केंद्रिय सशस्त्र पोलिस दल यासह राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या पोलिस दलातल्या मिळून एकंदर 36 वीरांना काल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते शौर्य पुरस्कार प्रदान करण्यात आले. शौर्य, धैर्य आणि कर्तव्यपरायणता यासाठी 10 कीर्ती चक्र आणि 26 शौर्य चक्र पुरस्कार देण्यात आले. यातील 7 कीर्ती चक्र आणि 7 शौर्य पुरस्कार मरणोत्तर प्रदान करण्यात आले. राष्ट्रपती भवनात झालेल्या या कार्यक्रमाला उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

**<u>नीट पीजी</u>**

वैद्यकीय शाखेच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठीची प्रवेश परीक्षा नीट पीजी आता 11 ऑगस्ट रोजी घेतली जाणार आहे. राष्ट्रीय परीक्षा मंडळानं या परीक्षेचं सुधारित वेळापत्रक काल जारी केलं. पेपरफुटीमुळे गेल्या महिन्यात ही परीक्षा पुढे ढकलण्यात आली होती.

**<u>संपूर्णता अभियान</u>**

सध्या देशभरात आंकांक्षित जिल्ह्यांच्या संपूर्ण विकासासाठी नीती आयोगानं संपूर्णता अभियान सुरू केलं आहे. याअंतर्गत धाराशिव जिल्ह्यातल्या परांडा तालुक्यात आयोजित आरोग्य शिबिराचा लाभ घेतलेली लाभार्थी महिला म्हणाली....

**<u>डॉ.विवेक देबरॉय</u>**

पुण्यातील गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्थेचे नवे कुलपती म्हणून डॉ. विवेक देबरॉय यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी आणि गोखले इन्स्टिट्यूटनं देबरॉय यांची निवड केली आहे. डॉ. विवेक देबरॉय सध्या पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेचे अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. नीती आयोगाचे सदस्यही होते.

**<u>पालखी सोहोळा</u>**

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांचा पालखी सोहोळा आज सातारा जिल्ह्यात प्रवेश करणार आहे. या पालखी सोहोळ्याच्या स्वागताची जय्यत तयारी जिल्हा प्रशासनानं केली आहे. विभागीय आयुक्त डॉक्टर चंद्रकांत पुलकुंडवार यांनी काल जिल्ह्यातल्या लोणंद, तरडगाव, फलटण आणि बरड इथं पालखी तळाची पाहणी केली. दरम्यान, शासनाच्या विविध योजनांची आणि उपक्रमांची माहिती जनसामन्यांपर्यंत पोहचवण्यासाठी माहिती आणि जनसंपर्क

महासंचालनालयाची संवाद वारी आज जिल्ह्यात लोणंद इथून सुरू होणार आहे. या संवाद वारीमध्ये चित्ररथ, एलईडी मोबाईल व्हॅन, प्रदर्शन संच, लोककलापथक आणि पथनाट्याचा समावेश आहे.

**<u>भात बियाणी-सिंधुदुर्ग</u>**

भात हे तळ कोकणातलं मुख्य पीक; मात्र भाताची पारंपरिक बियाणी आता दुर्मिळ झाली आहेत. त्यावर उपाय म्हणून सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या कुडाळ तालुक्यातल्या नेरुर गावचे शेतकरी सूर्यकांत कुंभार यांनी अशा बियाण्यांची बँक तयार केली आहे. या बँकेत आता भाताच्या 30 प्रकारच्या वाणांसह भाजीपाला, फळभाज्या, कडधान्यं अशी बियाणी आहेत. सेंद्रिय पद्धतीनं तयार केलेल्या या 1 किलो बियाण्यांच्या बदल्यात दोन किलो बियाणी पुन्हा बँकेत जमा करायची असा हा व्यवहार असतो. या बियाण्यांच्या उपयुक्ततेविषयी माहिती देताना कुंभार म्हणाले,

**<u>निधन</u>**

पुण्यातील प्रख्यात सामाजिक कार्यकर्त्या डॉ. अरुंधती सरदेसाई यांचं गेल्या आठवड्यात अमेरिकेतल्या फिलाडेल्फिया इथं निधन झालं; त्या 80 वर्षांच्या होत्या. मानव्य या संस्थेसह अनेक सामाजिक संस्थांशी त्यांचा जवळचा संबंध होता. साहसी गिर्यारोहणाची त्यांना आवड होती.

**<u>क्रिकेटपटू सत्कार</u>**

विश्वकरंडकविजेत्या भारतीय क्रिकेट संघाला राज्य सरकारनं 11 कोटी रुपयांचं बक्षीस जाहीर केलं आहे. काल विधान भवनाच्या मध्यवर्ती सभागृहात या संघातल्या रोहित शर्मा, सूर्यकुमार यादव, यशस्वी जयस्वाल आणि शिवम दुबे या खेळाडूंचा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यावेळी मुख्यमंत्र्यांनी बक्षिसाची घोषणा केली. खेळाडू घडवण्यासाठी क्रीडा अकादमी सुरू करण्यात राज्य सरकार पूर्ण सहकार्य करेल असं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिलं. कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, विधान परिषदेच्या उपसभापती ॲड. नीलम गोऱ्हे यांच्यासह अन्य मंत्री आणि मान्यवर उपस्थित होते. विश्वविजेत्या भारतीय संघाचं मुंबईत झालेलं स्वागत अभूतपूर्व आणि स्वप्नवत असल्याची भावना चारही खेळाडूंनी व्यक्त केली.

**<u>महिला क्रिकेट</u>**

महिलांच्या क्रिकेटमध्ये, दक्षिण आफ्रिकेनं काल रात्री चेन्नईच्या एम ए चिदंबरम मैदानावर तीन सामन्यांच्या T20 आंतरराष्ट्रीय मालिकेतील पहिल्या सामन्यात भारताचा 12 धावांनी पराभव केला. विजयासाठी 190 धावांचा पाठलाग करताना भारतीय महिलांनी निर्धारित 20 षटकांत 4 बाद 177 धावा केल्या. तत्पूर्वी, दक्षिण आफ्रिकेने 20 षटकांत 4 बाद 189 धावा केल्या. दक्षिण आफ्रिकेसाठी तझमिन ब्रिट्सने 81 धावांचं योगदान दिलं तर भारताच्या स्मृती मन्धना हिनं 46 धावा केल्या. तझमिन ब्रिट्सला सामनावीर म्हणून गौरवण्यात आलं. दक्षिण आफ्रिकेच्या भारत दौऱ्याचा हा शेवटचा टप्पा आहे, यामध्ये आतापर्यंत पन्नास षटकांचे तीन सामने आणि एक कसोटी सामना खेळला गेला आहे. भारतानं 50 षटकांच्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेला 3-0 असं पराभूत केलं आणि कसोटी सामना 10 गडी राखून जिंकला.

**<u>हवामान</u>**

येत्या 24 तासात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी पाऊस पडेल. मराठवाड्यात काही ठिकाणी पावसाचा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे. कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्राचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.**